# :: प्रेस नोट ::

## आरोपी गोविंद शालीकराम बारसाकडे कनिष्ठ लिपीक कार्यालय पोलीस अधिक्षक, चंद्रपूर यांना कारावासाची शिक्षा

तक्रारदार यांचे बाविस दिवस वैद्यकीय रजा बिनपगारी न करता अर्जीत रजेतून पो.अ. यांचेकडून मंजूर करण्याकरीता १०००/— रू लाचेची मागणी करून लाचरक्कम स्विकारली आरोपी गोविंद शालीकराम बारसाकडे कनिष्ठ लिपीक कार्यालय पोलीस अधिक्षक, चंद्रपूर यांनी तक्रारदार यांना १०००/—रू लाचेची मागणी करून स्विकारल्याने त्यांचे विरूध्द दि. १०/११/२००९ रोजी पोस्टे रामनगर अ.क्र. ३३७६/०९ कलम ७, १३, (१) (ड), सह कलम १३ (२) ला.प्र.का. १९८८ अन्वये नोंद करण्यात आला. सदर गुन्हयाचा तपास पुर्ण करून मा. न्यायालयात दोषारोप पत्र सादर करण्यात आले.

मा. श्रीमती कविती बी. अग्रवाल, मा. प्रमुख जिल्हा न्यायाधिश चंद्रपूर यांचे न्यायालयात सदर खटला चालविण्यात आला. दि. ०६/०२/२०२१ रोजी मा. न्यायालयाने आरोपी गोविंद शालीकराम बारसाकडे कनिष्ठ लिपीक कार्यालय पोलीस अधिक्षक, चंद्रपूर यांना ७ लाप्रका मध्ये १ वर्षे सश्रम कारावास व २०००/— रुपये दंड दंड न भरल्यास १ महिने सश्रम कारावासाची शिक्षा व १३, (१) (ड), सह कलम १३ (२) लाप्रका. अन्वये २ वर्षे सश्रम कारावास व ३०००/— रुपये दंड, दंड न भरल्यास १ महिने सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली आहे.

सदर गुन्हयाचा तपास श्री अशोक जोत, तत्कालीन पोलीस उप अधिक्षक, लाप्रवि चंद्रपूर यांनी पुर्ण करुन न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. सरकारी पक्षाचे वतीने जिल्हा शासकीय अभियोक्ता ॲड. श्री प्रशांत घटटुवार यांनी काम पाहिले व त्यांना श्री अविनाश भामरे, पोलीस उपअधीक्षक, नापोशि अरूण हटवार लाप्रवि. चंद्रपूर यांनी सहाय्य केले.

**श्रीमती रश्मि नांदेडकर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो नागपूर परिक्षेत्र तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये कोणी अधिकारी/कर्मचारी किंवा यांचे वतीने कोणी खाजगी ईसम लाचेची मागणी करीत असल्यास कृपया ॲन्टी करप्शन ब्युरो, कार्यालयाशी संपर्क साधावा.**

SP ACB Nagpur- 7040222221
Landline no. - 0712/ 2561520
Toll Free No. 1064
Website:- www.acbmaharashtra.gov.in
Mobile App:- www.acbmaharashtra.net
Facebook Page:- www.facebook.com/MaharashtraACB
Whatapp No- 9930997700

(गोरख कुंभार)
पोलीस निरीक्षक (वाचक)
ॲन्टी करप्शन ब्युरो, नागपूर